Postal Registration No. KLR-114/-2024-26
Reg.No.54851/1983 RNI.New Delhi
सर्वसामान्यांच्या चळवळीतील अग्रेसर... ...रौप्यमहोत्सवी-राज्यस्तरीय वृत्तपत्र!

# क्रांतीसिंह

सायंदैनिक | संस्थापक-संपादक : सुनंदा मोरे (बी.कॉम.ऑनर्स) | किंमत : ३ रूपये

*वर्ष ४२/अंक ८८ * सोमवार, ता. ०५ ऑगस्ट २०२४ * डाक आवृत्ती ता ०६/०८/२०२४ *

# सामाजिक बांधीलकी आणि सर्व स्तरातील महिलांच्या उद्धारासाठी स्थापन झालेली कोल्हापूर महिला सह.बँक

***कोल्हापूर(प्रतिनिधी):-" पंतप्रधान मोदी यांनी देशातील महिला, युवक व लधु उद्योजकांना चालना देण्याचे आवाहन केले आहे. महिला बँक ही गेली ५१ वर्षे ग्रामीण व शहरी भागातील महिलांना अर्थसहाय्य करून स्वयंरोजगाराची निर्मिती करण्याकरिता प्रेरणा देत आली आहे. महिलांच्याकडे मुलभूत काही तरी नवीन करण्याची स्वयंओढ असतेच, त्याच कौशल्याला अर्थसहाय्य मिळाले तर तो व्यवसाय त्यांच्या कुटुंबासाठी आर्थिक स्त्रोत होऊ शकतो. कोरोना काळात याची विशेष गरज जाणवली. परंतु कोणताही व्यवसायासाठी भांडवलाची नेहमीच गरज असते. महिला बँकेने समाजातील अनेक गरजवंतांना आर्थिक मदत दिली आहे. बँक फक्त देवघेवीचे व्यवहार न करता सामाजिक बांधिलकीतून महिलांचा उद्धार करण्याचे महत्वपूर्ण काम करीत सुवर्णमहोत्सवी वर्षेही पार केले आहे. अनेक समाजोपयोगी कामकाज केल्यामुळे बँकेला अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. सभासदांच्या विश्वासावर व संचालक मंडळाच्या दुरदृष्टीच्या कारभारामुळेच बँकेची आर्थिक उत्तरोत्तर प्रगती होत आहे. वाढत्या तंत्रज्ञानामुळे बँकांचे कामकाज अधिक गतीमान झाले आहे. सभासदांनाही अधिक सोयी सुविधा देणे आवश्यक ठरत आहे. त्याप्रमाणे बँकेमार्फत त्या सर्व सोयीसुविधा पुरविल्या जातात. सभासदांना यावर्षी १० टक्के लाभांश देण्याची शिफारस करण्यात आली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात महिलांची आर्थिक हक्काची बँक म्हणून महिला बँकेकडे पाहिले जाते. सुनियोजित व पारदर्शी कारभारामुळे बँकेने अ वर्ग मिळविण्याची आपली परंपरा यावर्षीही कायम ठेवली आहे. सभासदांच्या हिताचे व रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार कामकाज करून बँकेला अधिक आर्थिकदृष्टया परिपूर्ण करण्याचे आश्वासन आम्ही सभासदांना देत आहोत, असे मत अध्यक्षा शैलजा सुर्यवंशी व उपाध्यक्षा माधुरी शिंदे यांनी व्यक्त केले.***



***शैलजा सुर्यवंशी**,अध्यक्षा*

बँकींग क्षेत्र हे दिवसेंदिवस गतीमानतेने बदलत चालले आहे. डिजिटलायझेशनमुळे आर्थिक व्यवहार हे मोबाईलच्या माध्यमातून करण्यात येऊ लागले आहे. तंत्रज्ञानामुळे बँकींग व्यवहार बदलत चालले आहेत. अशा परिस्थितीत सभासदांना सर्व तांत्रिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे महत्वाचे काम बँकेने गेली ५० वर्षे केले आहे. पंतप्रधानांनी सांगितल्या प्रमाणे महिलांना अधिक सक्षम करण्यासाठी बँकेने नेहमीच प्रयत्न केले आहेत. छत्रपती शाहू महाराजांच्या बहुजन उद्धारासाठी सहकाराचा योग्य वापर करण्याच्या कामाचा वारसा बँकेने आजअखेर राखला आहे. म्हणूनच समाजातील एक अग्रणी सहकारी बँक म्हणून महिला बँकेचा उल्लेख आवर्जून करण्यात येतो. सभासदांच्या विश्वासावर चाललेली ही बँक त्याच विश्वासाने अधिक उत्कृष्ट पद्धतीने चालवू. असा विश्वास आम्ही सभासदांना देऊ इच्छितो.

बँकेने ग्राहकांसाठी रूपे डेबिट कार्ड, पॉज, ई कॉमर्स, आयएमपीएस, मोबाईल फोन द्वारे फंडस् ट्रान्सफर करणे, ठेव-कर्ज व्याजदर खाते उतारे आणि चेकबुक मागणी सुविधा सुरू आहेत. बँकेची युपीआय सुविधा तसेच कोअर बँकींग सेवा सुरू आहे. बँकेने मे. माय कार्ड कन्स्ल्टन्सी अँड बीपीओ सोल्यूशन प्रा.लि. मुंबई यांच्याकडे क्लाऊड बेस डेटा सेंटर आणि डीआर साईट भाडे तत्वावर घेतलेली आहे. एसएमएस सुविधा, एसीएच क्लिअरिंग,सीटीएस क्लिअरिंग, आरटीजीएस/नेफ्ट,आधार कार्ड संलग्न अनुदान, सर्व शाखांतून प्रमुख शहरावरील डिमांड ड्राफ्ट, सहा शाखांत लॉकर्स सुविधा आदी सेवा ग्राहकांसाठी बँकेमार्फत दिल्या जातात. बँकेच्या वेबसाईटवर सभासद, ग्राहकांना ठेवी, कर्जे आणि सर्व सोयी सुविधांची माहिती उपलब्ध आहे. बँक गुगल पे आणि भीम अॅपला लाईव्ह आहे. क्यू आर कोड करीता पेटीएम समवेत टाय-अप केला आहे. डिजि टल चॅनेल वापरताना त्यातील धोक्यांची ग्राहकांना माहिती व्हावी म्हणून विविध माध्यमातून जनजागृती केली जाते. तसेच बँकेच्या वेबसाईटवरून ठेव कर्ज योजना आणि इतर सोयीसुविधांची माहिती देण्यात येते. डिजिटल सेवा वापरण्यास चांगला प्रतिसाद मिळत आहे. यापुढेही जास्तीत जास्त डिजिटल सेवांचा सभासदांनी लाभ घ्यावा.

गुंतवणूकदारांसाठी अनेक आकर्षक व्याजदराच्या ठेव योजना चालू असून पाच लाखा पर्यंतच्या एकत्रित ठेवींना विमा संरक्षण आहे. ज्येष्ठ नागरिकांना ठेवीवर पाव टक्का जास्त व्याजदर दिला जातो.२५ लाखां वरील कर्जे ही ५० टक्क्यांपेक्षा कमी असावीत, अशा रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचना असल्याने लघु/कुटिर/शेती उद्योग आणि आर्थिक विकासाला हातभार लावणाऱ्या क्षेत्रास जास्त कर्ज पुरवठा करून देशाच्या अर्थ व्यवस्थेचा समतोल राखण्याचा प्रयत्न केला आहे. सभासदांना गरजेसाठी व उद्योग व्यवसायासाठी बँकेने कर्जे दिली असून त्यामध्ये अग्रक्रम क्षेत्रास ७६.२३ टक्के आणि दुर्बल घटकांना २७.४५ टक्केकर्जे दिली आहेत. भारत सरकारने बँकींग रेग्युलेशन अॅक्टमध्ये नागरी बँकांसाठी काही महत्वाच्या सुधारणा केलेल्या आहेत. सुधारित



***माधुरी शिंदे**, उपाध्यक्षा*

कायद्यानुसार नागरी बँकांवर नियंत्रण ठेवण्याचे सर्व अधिकार रिझर्व्ह बँकेला प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार रिझर्व्ह बँकेने घालून दिलेल्या नियमांचे

(पान ४ वर)

## महिला बँकेची आजची आर्थिक स्थिती

***कोल्हापूर महिला बँकेचे सुमारे १२ हजार २९६ सभासद, ४ कोटी ७७ लाखाचे भागभांडवल,१२ कोटी ३ लाख ६० हजाराचा राखीव व इतर निधी,९८ कोटी ९७ लाखाच्या ठेवी,५० कोटी ८० लाखाची गुंतवणुक,५९ कोटी ६८ लाखाची सभासद कर्जे, ७४ लाख ६४ हजाराचा नफा,११९ कोटी ३ लाख ४५ हजाराचे खेळते भांडवल, सीआरएआर प्रमाण १७.६९ टक्के, थकबाकी प्रमाण ८.३४ टक्के व निव्वळ एनपीए प्रमाण शून्य टक्के आहे.***



***बँकेच्या राजारामपुरी शाखेच्या नुतनीकरणाचा शुभारंभ करताना अध्यक्षा शैलजा सुर्यवंशी, उपाध्यक्षा माधुरी शिंदे, समवेत संचालिका मंडळ, अधिकारी व खातेदार.***

# जिल्हा परिषद सुरू करणार कनिष्ठ महाविद्यालय

कोल्हापूर (प्रतिनिधी):- गोरगरीब आणि होतकरू मुला-मुलींना चांगल्या आणि कमी खर्चात शिक्षण घेता यावे यासाठी जिल्हा परिषदेने कनिष्ठ महाविद्यालय(ज्युनिअर कॉलेज) सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. शिंगणापूर (ता. करवीर) येथील निवासी प्रशालेच्या ठिकाणी अकरावी बारावी पर्यंतचे महाविद्यालय सुरू करण्याची तयारी केली जात आहे.

कोल्हापूर ही क्रीडा नगरी आहे. जिल्ह्यातील वैभवशाली क्रीडा परंपरेला उर्जितावस्था देण्यासाठी जिल्हा परिषदेने जिल्ह्यातील गुणवान खेळाडूंना राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर पोचवण्यासाठी संकल्प करून निवासी प्रशाला सुरू केली. जिल्ह्यातील गोरगरीब व होतकरू मुला-मुलींना शिक्षणाच्या हक्कासह मुक्तपणे खेळण्याचाही हक्क मिळावा यासाठी या शाळेची निर्मिती केली आहे.

दहावीपर्यंत राज्य पातळीवर विविध खेळांत चमकणाऱ्या विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयातही चांगले शिक्षण घेता यावे यासाठी जिल्हा परिषद आणि शिक्षण विभागाने पुढाकार घेतला आहे. शेकडो विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षण व खेळाचे प्रशिक्षण घेता येत नाही. याचाच विचार करून जिल्हा परिषदेकडून अकरावी आणि बारावीपर्यंतचे शिक्षण निवासी प्रशालेत दिले जाणार आहे.

निवासी प्रशालेत ११ ते १४ वयोगटांतील विद्यार्थ्यांची निवड केली जाते.येथे खेळाचे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दहावी नंतर इतर महाविद्यालयात जावे लागते.त्यामुळे जिल्हा परिषदेत तयार झालेल्या एखाद्या चांगल्या खेळाडूला नंतर दुसऱ्या महाविद्यालयाकडून खेळावे लागते. त्याऐवजी जिल्हा परिषदेच्या निवासी प्रशालेच्या खेळाडूला जिल्हा परिषदेच्याच कॉलेज मध्ये शिकून आपले व जिल्हा परिषदेचे नाव राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकवता येणार आहे. त्यासाठी जि.परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. यांनी निवासी प्रशालेचे ज्युनिअर कॉलेज करण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण भागातील विविध ठिकाणी अनेक सोयीसुविधा केल्या जातात. अलिकडे जि.प.च्या शाळा पूर्णपणे तांत्रिक दृष्टया परिपूर्ण होत आहेत. अशामध्ये हुशार व होतकरून विद्यार्थ्यांसाठी कनिष्ठ महाविद्यालयाची सोय झाल्यास ग्रामीण विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेला अधिक वाव मिळेल.


## कोल्हापूर महिला सहकारी बँक लि;कोल्हापूर

**मुख्य कार्यालय : तुतुची बाग,खासबाग, कोल्हापूर. फोन : २५५०४२१/२२**

E-mail:-ho@kopmahilabank.com Website:-www.kopmahilabank.com

### वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस

**(फक्त भागधारक सभासदांसाठी)**

आपल्या बँकेची **सन २०२३-२०२४ चे अहवाल सालची ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक २३ ऑगस्ट, २०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता राजर्षी छत्रपती शाहू स्मारक भवन, दसरा चौक, कोल्हापूर** येथे भरणार असून या सभेत खालील विषयावर विचार विनिमय करणेत येणार आहे. तरी सदर सभेस आपण वेळेवर उपस्थित रहावे, अशी विनंती आहे.

*** सभेपुढील विषय ***

१) दि.१३ सप्टेंबर, २०२३ रोजी संपन्न झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२) सन २०२३-२०२४ सालचे प्रतिवृत्त, ताळेबंद व नफा-तोटा पत्रके स्विकृत करणे व मंजुरी देणे.
३) संचालिका मंडळाने सुचविलेले सन २०२३-२०२४ अखेरच्या नफा विभागणीस व लाभांश जाहीर करून वितरणास मंजुरी देणे.
४) सन २०२३-२०२४ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास आणि सन २०२४-२०२५ चे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रकास मंजुरी देणे आणि प्रगती तक्त्याची नोंद घेणे.
५) सन २०२२-२३ च्या वैधानिक लेखापरिक्षण दोष दुरूस्ती अहवालावर चर्चा करणे व अहवाल स्विकारणे.
६) वैधानिक लेखापरिक्षक मे.पाटील घेवडे महापूरकर अँण्ड असोसिएट्स-सी.ए. कोल्हापूर आणि अंतर्गत लेखापरिक्षक मे. सुधाकर कुलकर्णी आणि कंपनी, सी.ए. सातारा यांचेकडून सन २०२३-२०२४ सालाकरिता आलेल्या अहवालावर विचार करणे.
७) सन २०२४-२०२५ करिता वैधानिक लेखापरिक्षकांचे नेमणूकीबाबत संचालक मंडळाने शिफारस केलेनुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया यांचे निकषास अधीन राहून नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.
८) बँकेच्या संचालिका मंडळ सदस्या व त्यांचे नातेवाईक यांच्या सन २०२३-२०२४ साल अखेर येणे असलेल्या कर्जाची नोंद घेणे.
९) महाराष्ट्र शासनाच्या एक रक्कमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत सवलत दिलेल्या थकीत कर्ज खात्यांची माहिती घेणे व संचालिका मंडळाच्या निर्णयाची नोंद घेणे.
१०) वार्षिक सर्वसाधारण सभेस सभासदांच्या अनुपस्थितीस माफी देणेबाबत विचार करणे.
११) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

स्थळः कोल्हापूर
दिनांकः १०/०७/२०२४

मान. संचालिका मंडळाचे आज्ञेवरून,
**(जे.के. कुंभार)**
महाव्यवस्थापक

**महत्त्वाची सूचना :-** अ) गणसंख्येअभावी सभा तहकूब झालेस सदर सभा त्याच दिवशी वरील ठिकाणी अर्ध्या तासाने सुरू होईल आणि या सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही. ब) बँकेचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक आणि लेखापरिक्षण अहवाल बँकेच्या मुख्यालय आणि शाखा कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध केलेले आहे. अहवाल प्रत बँकेच्या मुख्यालयातून लेखी मागणी करून उपलब्ध होईल. नोटीस व आर्थिक पत्रके बँकेच्या वेबसाईटवर पाहण्यास उपलब्ध आहेत. क) या सभेच्या विषया संदर्भातील विचारावयाचे प्रश्न दिनांक १९/०८/२०२४ पर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयात महाव्यवस्थापक यांचेकडे लेखी द्यावयाचे आहेत.ड) उपस्थित सभासदांना सभेस उपस्थित राहील्याबद्दल उपस्थिती प्रमाणपत्र देणेत येणार आहे. सभासदांनी सभेस येताना सभा नोटीस व बँक ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

प्रेषक : सौ. शैलजा सुर्यवंशी, अध्यक्षा, कोल्हापूर महिला सहकारी बँक लि., कोल्हापूर

'क्रांती हे मानवाचे अविभाज्य अंग आहे'-शहिद भगतसिंग
महाराष्ट्रव्यापी-राज्यस्तरीय दैनिक... सर्वच ठिकाणी एकच आवृत्ती!

# क्रांतीसिंह

संस्थापक-संपादक :श्रीमती सुनंदा मोरे, बी.कॉम.
हे वृत्तपत्र मालक,मुद्रक, प्रकाशक सौ. सुनंदा प्रकाश मोरे यांनी, नंदज्योती मुद्रण-प्रकाशन, न्यू महाद्वार रोड ,उद्यमनगर कोल्हापूर येथे छापून मुख्य कार्यालय-१६७२, बी वॉर्ड, न्यू महाद्वार रोड, नेहरू बागेजवळ, कोल्हापूर,सांगली,सातारा व सिंधुदुर्ग येथून प्रसिद्ध केले.
सहाय्य-ओंकार मुद्रणालय,शिवाजी उद्यमनगर,कोल्हापूर
सवलतीच्या दराने अंक पोस्टींग करण्याचा परवाना क्रमांक:- केएलआर-११४/२०२४-२६, पोस्ट - आरएमएस,कोल्हापूर




# कोल्हापूर महिला सहकारी बँकेचे कार्यक्षम संचालिका मंडळ


मनिषा दमामे | सुनिता डोंगळे | जानकीदेवी निंबाळकर | तिलोत्तमा भोसले | भारती डोंगळे | सुधा इंदूलकर | सुप्रिया पाटील(कौलवकर)


शुभांगी सुसिंद्रन(भोसले) | मोहिनी घोटणे | मथुराबाई सुतार | जयश्री परमाळे | विजया जाधव तज्ञ संचालिका | पुजा धर्माधिकारी तज्ञ संचालिका | जे.के.कुंभार महाव्यवस्थापक

## बँकेच्या सर्व सभासदांना विशेष विनंती

१) आदर्श पोटनियमाप्रमाणे सभासदांची क्रियाशील व अक्रियाशील सभासद अशी विभागणी केली जाते. तेव्हा सभासदांनी किमान रूपये १ हजारचे शेअर्स धारण करावेत, किमान रूपये १० हजार ठेव ठेवावी किंवा २५ हजार कर्ज घ्यावे. त्याचबरोबर पाच वर्षांमध्ये किमान एका वार्षिक सभेस उपस्थित रहावे. २) सभासदांनी आपल्या पत्त्यातील अगर अन्य बदलांची नोंद त्वरीत बँकेकडे द्यावी.३) वारस नेमण्याची कार्यवाही बँकेत येऊन विनाविलंब करून घ्यावी. ४) ओळखपत्रासाठी आयडेंटीटी कार्ड साईज दोन फोटो देऊन ओळखपत्र तयार करून घेणेत यावे. ५)बँकेतील ५ लाख रूपयेपर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण आहे.

## ग्राहकांसाठी विशेष सूचना

* महिला बँकेची रूपे डेबिट कार्ड एटीएम, मोबाईल बँकींग,युपीआय आणि क्यू आर कोड सुविधा सुरू आहे * बँकेचे रूपे डेबिट एटीएम कार्डद्वारे कोणत्याही बँकेच्या एटीएम सेंटरवरून रोख रक्कम काढता येते. * बँकेच्या युपीआयद्वारे (फोन पे/गुगल पे), लाईट बील, पाणीबील भरणे, विविध वस्तू व सेवा खरेदी करता येतात.* आपल्या एटीएम कार्डचा पीन क्रमांक, सीव्हीव्ही क्रमांक, ओटीपी इत्यादी कोणालाही सांगू नये.* आपले एटीएम कार्ड गहाळ झाल्यास संबंधित शाखेमध्ये संपर्क करून कार्ड ब्लॉक करून घ्यावे.** रूपे डेबिट कार्ड , मोबाईल बँकींग, युपीआय, क्यूआर कोड सुविधा घेणेकरिता बँकेच्या जवळच्या शाखेशी संपर्क करावा. * बँकेच्या डिजिटल बँकींग सेवेचा लाभ जास्तीत जास्त सभासद,ग्राहक, खातेदारांनी घ्यावा.

* बँकेच्या विविध आकर्षक ठेव योजनांचा लाभ घ्यावा. * कोल्हापूर महिला बँकेतील ५ लाखापर्यंतच्या सर्व ठेवींना विमा संरक्षण आहे.*डिआयसीजीसीकडे दि.८/५/२०२४ रोजी ठेव विमा हप्ता भरला आहे.

# सभासद-ग्राहकांना सुविधा देणारी महिला बँक


बँकेच्या शाखा पट्टणकोडोली शुभारंभ प्रसंगी अध्यक्षा शैलजा सुर्यवंशी, उपाध्यक्षा माधुरी शिंदे, महाव्यवस्थापक जे.के. कुंभार समवेत संचालिका मंडळ, अधिकारी व खातेदार.

(पान १ वरून)
बँकेत काटेकोरपणे पालन केले जाते.

बँकेच्या सर्व शाखा व मुख्यालय संगणकीय कोअर बँकींग प्रणालीने जोडल्या असून कोणत्याही शाखेतून ग्राहकांना देवघेवीचे व्यवहार करता येतात.उद्योग-व्यवसाय, गृहपयोगी वस्तू-वाहन खरेदी, शेती व कृषी पूरक व्यवसाय, शैक्षणिक आणि अनुषांगिक कारणासाठी परतफेडीची क्षमता पाहून रास्त व्याजाने कर्जे दिली जातात. सोने जिन्नस,विमा पॉलिसी, राष्ट्रीय बचतपत्रे यांच्या तारणावर कर्ज देण्याचीही सोय आहे. कर्जांच्या वसुलीसाठी प्रभावीपणे अंमलबजावणी केली जाते. कर्जदारांनी कर्जाचे हफ्ते नियमित भरावेत. तसेच ठेवीदारांसाठी आकर्षक व्याजदराच्या विविध ठेव योजना आहेत. त्याचाही लाभ घ्यावा. बँकेच्या दैनंदिन कामकाजात व प्रगतीत सेवकांचे चांगले सहकार्य मिळते. त्या सर्वांना ऑनलाईन व प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले आहे. कर्मचाऱ्यांच्या बरोबर संचालक मंडळालाही प्रशिक्षित करून कामकाज कसे करावे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. अम्ब्रेला ऑर्गनायझेशनने नागरी बँकांचे पालकत्व स्विकारलेने या केंद्रीय संस्थेचा हातभार बँकांच्या प्रगतीसाठी लागणार आहे.त्यामुळे सहकारी बँका अधिक कार्यक्षमपणे कामकाज करू शकतील.

बँकेमार्फत सभासद व त्यांच्या कुटुंबियांना गंभीर आजारावर उपचार, शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदत करण्यात येते. सामाजिक भावनेतून नैसर्गिक संकटे व कौटुंबिक अडचणींच्यावेळी योग्य ती आर्थिक मदत केली जाते.

मार्च-एप्रिल २०२४ मध्ये इयत्ता १० वी-१२वी परीक्षेत ७० टक्के पेक्षा जास्त गुणाने उत्तीर्ण झालेल्या सभासदांच्या पाल्यांनी ३१ ऑगस्टपर्यंत गुणपत्रिकेसह अर्ज बँकेत सादर करावेत. २३ ऑगस्ट २०२४ रोजी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेस सभासदांनी उपस्थित रहावे, असेही आवाहन त्यांनी यावेळी केले आहे.

## केवायसी कागदपत्रांच्या पुर्ततेबाबत विनंती

बँकेच्या सर्व ग्राहक/खातेदारांना कळविणेत येते की, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार केवायसी नियमावली अंतर्गत बँकेने खातेदारांची जोखीम वर्गवारी निश्चित केलेली आहे. त्यानुसार खातेदारांनी ठराविक कालावधीनंतर अद्यावत केवायसी कागदपत्रांची पूर्तता करणे बंधनकारक आहे. तेव्हा सर्व खातेदारांनी ज्या शाखेमध्ये आपले खाते आहे त्या शाखेत खालील कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती सादर कराव्यात. १) अद्यावत दोन रंगीत फोटो २)रहिवाशी पुरावा (आधार कार्ड/पासपोर्ट/वीजबील यापैकी एक) ३) ओळख पुरावा (आधार कार्ड/पासपोर्ट/पॅन कार्ड यापैकी एक) ४) संस्था खाती (नोंदणी दाखला/संस्था कागदपत्रे/केवायसी कागदपत्रे). केवायसी कागदपत्रांची निर्धारित वेळेत पूर्तता न केलेस अशी खाती खातेदारांना कोणतीही पूर्वसूचना न देता बंद करणेत येतील, याची नोंद घ्यावी.

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत कोल्हापूर महिला सहकारी बँकेचा सेव्हींग खाते क्रमांक दिल्यास सदर रक्कम थेट आपल्या खात्यात जमा होईल.**

## शासकीय लेखापरिक्षकांचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी कायद्याच्या कलम ८१ (५) (ब) व नियम ६९ नुसार )

आम्ही सोबत जोडलेल्या कोल्हापूर महिला सहकारी बँक लि,कोल्हापूर या बँकेच्या ३१ मार्च २०२४ अखेरचा एकत्रित ताळेबंद (प्रधान कार्यालय व ७ शाखा) व त्या दिवशी संपणाऱ्या आर्थिक वर्षाचे एकत्रित नफा तोटा पत्रकाचे लेखापरिक्षण केलेले आहे. सदरची आर्थिक पत्रके ही बँकेच्या व्यवस्थापनाने बनविलेली असून ती त्यांची जबाबदारी आहे. सदर आर्थिक लेखापरिक्षणांवरून त्यावर अभिप्राय व्यक्त करणे इतकीच आमची जबाबदारी आहे.

भारतामध्ये प्रचलित असलेल्या लेखा परिक्षणाच्या मानदंड पद्धतीनुसार (Standard) आम्ही संस्थेचे लेखापरीक्षण केले आहे.सदरच्या आदर्श पद्धतीनुसार, संस्थेच्या आर्थिक पत्रकामध्ये कोणतेही मोठे/महत्वाचे (Material) चुकीचे विधान नाही.याची रास्त खात्री करण्याच्या दृष्टीने लेखापरीक्षणाचा आराखडा करणे व लेखापरिक्षण करणे जरूरीचे असते.लेखापरीक्षणात नमुना परीक्षण पद्धतीने (Test Check)आर्थिक पत्रकातील रक्कमा व त्याचे सादरीकरण(Disclosure) या संदर्भातील पुराव्याच्या तपासणीचा समावेश असतो.

लेखापरीक्षणामध्ये लेखाकर्माच्या तत्वांचा वापर व व्यवस्थापनाने केलेले महत्वाचे अंदाज याची तपासणी तसेच आर्थिक पत्रकामधील सर्वांगीण सादरीकरणाचे मुल्यांकन याचाही समावेश असतो. लेखापरीक्षण अहवालातील मत प्रदर्शनाला पुरेसा आधार आहे अशी आमची खात्री आहे. उपरोक्त आर्थिक पत्रकाबद्दल आम्ही जोडलेल्या टिप्पणी व शेऱ्यास पात्र राहून आम्ही अहवाल करतो की,

१) सदर बँकेचे प्रधान कार्यालय व ७ शाखा यांचे लेखापरिक्षण आम्ही केले आहे. २) आमच्या लेखापरीक्षणाचा उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरूर ती माहिती व खुलासे आम्हांस उपलब्ध झाले असून ती सर्व माहिती व खुलासे समाधानकारक आहेत.

३) आमच्या मते व आम्हाला मिळालेल्या माहिती व खुलाशाच्या आधारे आणि आम्ही केलेल्या व सोबत जोडलेल्या अहवालाच्या भाग अ ब व क मधील नमूद शेऱ्यास अनुसरून संस्थेचे ताळेबंद व नफातोटा पत्रक महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० ला अनुसरून तयार केलेले आहेत आणि आमच्या मते संपूर्ण माहितीप्रमाणे तसेच आम्हांस देण्यात आलेल्या खुलाशावरून व लेखापरिक्षण अहवालाच्या भाग अ ब व क मधील नमूद शेऱ्यास अनुसरून, अ) ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संस्थेने ठेवलेल्या हिशोब पुस्तकाशी जुळते असून सदर ३१ मार्च २०२४ या दिनांकाचा ताळेबंद बँकेच्या व्यवहाराची/कामकाजाची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो आणि नफा-तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफ्याची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो. (लेखापरिक्षण अहवालातील नफा-तोटा विवेचनातील शेऱ्यास पात्र राहून व महत्वाचे शेऱ्यास पात्र राहून) ब)संस्थेची हिशोब हे त्यावरील टिप्पणीस पात्र राहून महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या कायद्यानुसार आवश्यक ती माहिती देणारे आहेत व संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितात.

४)आमच्या मते एकत्रित ताळेबंद बँकींग रेग्युलेशन अॅक्ट १९४९(अॅज अॅप्लीकेबल टू को ऑपरेटिव्ह सोसायटी) चे तिसऱ्या परिशिष्टातील नमुन्याप्रमाणे कर्ज या खात्यातील पोट कलमातील माहितीसह रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाच्या नियमानुसार तयार करण्यात आला आहे.

५) आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल त्यावरून संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचा कायदा १९६० व त्याखालील नियम व संस्थेच्या पोटनियमाप्रमाणे अपेक्षित असल्याप्रमाणे पुस्तके ठेवली आहेत.

६) सन २०२३-२४ या वर्षाकरिता महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० खालील नियमानुसार व नवीन निकषाच्या आधारे बँकेस **अ** वर्ग देण्यात आला आहे.

मे. पाटील घेवडे महापूरकर अॅण्ड असोसिएटस्
सनदी लेखापरिक्षक

स्थळ-कोल्हापूर
दि.-२६/०६/२०२४

सही/-
(सी.ए.काशिनाथ एस.पाटील)
भागीदार
(मेंबरशीप नं. ११८१०३)
(एफ.आर.एन-१२६०००W)
UDIN: 24118103BKBHJG6465

(शिक्का)

## शिकणे-शिकविणे दृष्टिकोनात बदल

शिकण्याची प्रक्रिया केवळ 'माहिती पोचवणे' इथवरच मर्यादित नसून तो जिवंत संवाद आहे. ज्यामध्ये शिक्षक केवळ 'शिकवणारा' नसून विद्यार्थी आणि शिक्षक दोघेही ज्ञानाच्या अशा देवाण-घेवाणीसाठी जबाबदार असतात; ज्यामध्ये सर्वजण शिकतात.एक प्रमुख शैक्षणिक संस्था परदेशातील नामांकित शिक्षणतज्ज्ञांना व्याख्यानासाठी आमंत्रित करते. विद्यार्थ्यांना त्यांची आवड लक्षात न घेता या व्याख्यानासाठी उपस्थित राहण्यास सांगितले जाते. हॉल जेमतेम भरलेला असतो, बहुतेक विद्यार्थ्यांना, अनेक श्रोत्यांना व्याख्यानाच्या विषयात रस असल्याचे दिसत नाही.शिक्षणतज्ज्ञ त्या विषयातील आधुनिक विचारप्रवाह यावर पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन करतात; विद्यार्थी मात्र त्यांच्या स्वत:च्या संगणक आणि मोबाईलमध्येच गर्क असतात. सादरीकरणामधली माहिती चांगली असते, पण सहभागी झालेल्यांना यातून शिकता आलं का? नक्कीच नाही.आता दुसरा प्रसंग. त्याच शिक्षणतज्ज्ञांना व्याख्यानासाठी आमंत्रित केले. संस्थेने या विषयाची आवड असलेल्यांना उपस्थित राहण्याचे आमंत्रण दिले. शिक्षणतज्ज्ञ सहभागी झालेल्यांचे गट बनवतात, त्यांना या विषयाबद्दल आधीपासून माहीत असलेल्या गोष्टी, त्यांची मते काय आहेत यापासून सुरुवात करतात. त्यांना या विषयावरील काही खुल्या प्रश्नांवर चर्चा करण्यास सांगतात. गट त्यावर चर्चा, वादविवाद करतात, त्यांचे विचारही मांडतात. शिक्षण तज्ज्ञ शंकांचे निरसन करतात, उदाहरणे देतात. त्यांचे मत मांडतात. तज्ज्ञ चांगले शिकवतात का? नक्कीच. विद्यार्थ्यांना यातून शिकता आलं का? शक्यता आहे. वरीलपैकी कुठली पद्धत शिकण्यासाठी अधिक चांगली आहे?केवळ शिकवण्यावर लक्ष केंद्रित करण्याचे मूळ कारण हे आहे की, शिकणे ही प्रक्रिया फक्त औपचारिक शिक्षणापुरती मर्यादित आहे, असा गैरसमज आहे. खरंतर शिकणे ही दैनंदिन क्रिया आहे.शाळा-कॉलेजच्या आत आणि बाहेरही घडणारी. प्रत्येक व्यक्तीत जिज्ञासा, कुतूहल जन्मापासूनच असते. कुठल्याही शैक्षणिकव्यवस्थेचा भाग न होताही, माणसे विविध प्रकारे शिकतात. ती निसर्गातून शिकतात, ती इतरांशी बोलताना, निरीक्षण करत, कामं करत, समस्या सोडवताना शिकतात. जीवन जगताना शिकण्याची प्रक्रिया अखंड सुरू असते. जागरूक स्थितीत अस्तित्वाचा प्रत्येक क्षण शिक्षण आहे.जे. कृष्णमूर्ती म्हणतात, 'जीवनाचा संपूर्ण प्रवास शिक्षण आहे. शिक्षणाचा उद्देश मग, ही शिकण्याची प्रक्रिया सोपी करणे आणि तिला गती देणे आहे. शिकवणे आणि शिकणे हे शब्द बऱ्याचदा एकाच अर्थाने आणि जोडीने वापरले तरी, त्याकडे बारकाईने पाहणे जरुरीचे आहे. अध्यापन किंवा शिकवणे या शब्दाचा संबंध फक्त शिक्षकाशी असतो पण शिकणे या क्रियेत शिक्षक आणि विद्यार्थी दोघांचाही समावेश असतो.शिकविण्यामधली मानसिकता ही 'देण्याची' असते. शिक्षकाला वाटते की त्याच्याजवळ असलेले ज्ञान (जे विद्यार्थ्याकडे नाही) ते त्याला 'देणे' आवश्यक आहे. या युक्तिवादात काही मूलभूत त्रुटी आहेत. एक म्हणजे संपूर्ण ज्ञान एका ठिकाणी असू शकत नाही (आणि त्याची आवश्यकताही नाही). दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे यामुळे विद्यार्थ्यांनादेखील एखाद्या गोष्टीबद्दल माहिती असेल किंवा त्यांचे काही मत असेल याबद्दलचा अविश्वास व्यक्त होतो.अशी एकेरी शिकवण्याची पद्धत विद्यार्थ्यांना प्रश्न विचारणे, समजून घेणे, प्रयोग करणे अशी मोकळीक देत नाही. त्यामुळेच ती शिकण्यासाठी हानिकारक ठरते. 'माणूस ज्याच्या निर्मितीत हातभार लावतो त्यालाच पाठिंबा देतो'; आणि विद्यार्थीसुद्धा माणूसच आहे ना? औपचारिक शिक्षणाच्या वातावरणात आणखी दोन गोष्टी आहेत ज्या शिकण्यात प्रामुख्याने अडथळा आणतात.पहिली म्हणजे 'शिस्त' आणि 'सुव्यवस्थेच्या' नावाखाली शिक्षणसंस्थेचे 'भीतीने' भरलेले वातावरण. अधिकाराची भीती, अपयशाची भीती, टिंगलटवाळीची भीती, परीक्षेची भीती. तुम्ही तुमच्या आयुष्यात ज्या सर्वात महत्त्वाच्या गोष्टी शिकलात त्या आठवा- त्या काय भीतीमुळे शिकला? भीती केवळ आत्ताच्या शिकण्यातच अडथळा आणत नाही तर 'कसे शिकायचे' याचा आत्मविश्वास मिळवत जे तरुण मन खरोखरच भयमुक्त वातावरणात बहरले पाहिजे त्यावर आघात करते. आपल्यापैकी बहुतेकांच्या लक्षात असेल की, आपण मित्रांसोबत केलेल्या चर्चा, समजून घेतलेल्या संकल्पना- सहयोगी शिक्षण- हे सर्वात जास्त काळ टिकले, लक्षात राहिले! त्यामुळे शिक्षणाचा केंद्रबिंदू शिकवण्याकडून शिकण्याकडे, शिक्षकाकडून विद्यार्थ्याकडे सरकण्याची आवश्यकता आहे. यासाठी चार गोष्टी महत्त्वाच्या आहेत.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाची अपेक्षा करते. ती साध्य व्हावयाची तर खुले वातावरणच हवे. 'शिकवणे' ते 'शिकणे' या दृष्टिकोनामधील बदलात वरील सर्व सामावले आहे. यासाठी शिक्षकवर्ग आणि शिक्षण नोकरशाही तयार आहेत का?

# KOLHAPUR MAHILA SAHAKARI BANK LTD.,KOLHAPUR

**BALANCE SHEET AS ON 31.03.2024** ( Amount in Lakh)

| CAPITAL & LIABILITIES | भांडवल व देणी | Schedule No. | As on 31.03.2024 | As on 31.03.2023 |
|---|---|---|---|---|
| Capital | खपलेले भाग भांडवल | 1 | 477.70 | 457.66 |
| Reserve Fund and Surplus | गंगाजळी व नफा | 2 | 1278.24 | 1214.94 |
| Deposits | ठेवी | 3 | 9897.26 | 9787.91 |
| Borrowings | घेतलेली कर्जे | 4 | 0.00 | 0.00 |
| Other Liabilities & Provisions | इतर देणी व तरतुदी | 5 | 708.33 | 711.71 |
| | Total | | 12361.53 | 12172.22 |

| ASSETS | जिंदगी | Schedule No. | As on 31.03.2024 | As on 31.03.2023 |
|---|---|---|---|---|
| Cash and Balances with RBI | रोख व आरबीआयकडील शिल्लक | 6 | 169.92 | 80.03 |
| Balances with Banks and Money at Call & Short Notices | इतर बँकातील शिल्लक व कॉल मनी नोटीस | 7 | 1586.84 | 1526.23 |
| Investments | गुंतवणुक | 8 | 3864.55 | 3890.16 |
| Advances | कर्जे | 9 | 5968.48 | 5897.13 |
| Fixed Assets | इमारत जागा व डेड स्टॉक | 10 | 104.77 | 80.71 |
| Other Assets | इतर येणी | 11 | 666.97 | 697.96 |
| | Total | | 12361.53 | 12172.22 |

| CONTIGENT LIABILITIES | संभाव्य देणी व जबाबदाऱ्या | 1 2 | As on 31.03.2024 | As on 31.03.2023 |
|---|---|---|---|---|
| Bank Gurantee | बँक गॅरटी | | 14.36 | 13.93 |
| DEA Fund | डिफ फंड | | | |

# KOLHAPUR MAHILA SAHAKARI BANK LTD.,KOLHAPUR

**PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31.03.2023**

| Particulars | तपशील | Schedule No. | As on 31.03.2024 | As on 31.03.2023 |
|---|---|---|---|---|
| **Income** | उत्पन्न | | | |
| Interest Earned | व्याज जमा व कसर | 13 | 996.78 | 942.66 |
| Other Income | इतर जमा | 14 | 39.03 | 39.70 |
| | Total | | 1035.81 | 982.36 |
| **Expendiures** | खर्च | | | |
| Interest Expended | ठेवी व कर्जावरील व्याज | 15 | 534.47 | 520.29 |
| Operating Expenses | प्रशासकीय खर्च | 16 | 349.71 | 284.04 |
| Provisions and Contingencies | तरतूदी | 17 | 76.99 | 105.86 |
| | Total | | 961.17 | 910.19 |
| Net Profit /(Loss) Of The Year | वर्षाअखेरचा निव्वळ नफा | | 74.64 | 72.17 |
| | Total | | 1035.81 | 982.36 |
| **Appropriations** | | | | |
| Balance Profit of Last year | मागील वर्षाचा शिल्लक नफा | | 0.00 | 0.00 |
| Current Year Profit | वर्ष अखेरचा निव्वळ नफा | | 74.64 | 72.17 |
| Total Profit for Appropriation | एकूण नफा/(तोटा) | | 74.64 | 72.17 |
| | Total | | | |
| **Appropriations** | नफा विभागणी | | | |
| Transfer to Statutory Reserves | २५ टक्के रिझर्व्ह फंड | | 18.66 | 18.04 |
| Transfer to Divident | १० टक्के डिव्हीडंड | | 46.34 | 40.00 |
| Investment Flucation fund | गुंतवणूक चढ-उतार निधी | | 9.64 | 14.12 |
| | Total | | 74.64 | 72.17 |

The Notes to Financial Statement for the year ended 31st March 2024 as prescribed in Reserve Bank of India Master Direction on Financial Statement - Presentation and Discloures dated August 30.,2021 published on the Banks Website

तपासले. सामान्य शेरे व सूचनांस पात्र राहून बरोबर आहे.

**मे. पाटील घेवडे महापूरकर ॲण्ड असोसिएटस्** चार्टर्ड अकौंटंट,कोल्हापूर — **एन.व्ही.कदम** प्र.लेखापाल — **एन.पी.पाटील** व्यवस्थापक

**जे.के.कुंभार** महाव्यवस्थापक — **माधुरी शिंदे,** उपाध्यक्षा — **शैलजा सुर्यवंशी,** अध्यक्षा

**संचालिका :** मनिषा दमामे, सुनिता डोंगळे, जानकीदेवी निंबाळकर, तिलोत्तमा भोसले, भारती डोंगळे, सुधा इंदूलकर, सुप्रिया पाटील(कौलवकर), शुभांगी सुसिंद्रन(भोसले), मोहिनी घोटणे, मथुराबाई सुतार, जयश्री परमाळे, विजया जाधव, पूजा धर्माधिकारी.

## बँकेच्या कर्जदारांना कर्ज खात्यासंदर्भात विशेष आवाहन

बँकेच्या सर्व सभासद, कर्जदार, जामीनदार, खातेदार व ग्राहकांना विनंती करणेत येते की, रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आपण आपले कर्ज खाते SMA-0/1/2 किंवा NPA होणार नाही याची दक्षता घ्यावी. आपले खाते थकीत झालेस, कर्ज खात्याची माहिती बँकेमार्फत Credit Information Company जसे की CIBIL यांचेकडे पाठविली जाते. त्यामुळे CIBIL स्कोर कमी होतोच शिवाय पतमुल्यांकन कमी होते. आपले खाते एकदा NPA झालेस थकबाकीची चालू महिना अखेरची पूर्ण थकबाकी रक्कम भरलेशिवाय म्हणजेच थकबाकी शून्य झालेशिवाय कर्ज खाते NPA मधून बाहेर पडणार नाही. त्यामुळे कोणतीही आर्थिक संस्था आपणास अर्थसहाय्य करणार नाही, तेव्हा बँकेच्या सर्व सभासद, कर्जदार, जामीनदार, खातेदार व ग्राहकांनी आपल्या कर्जाचे हप्ते व व्याज नियमित भरून बँकेस सहकार्य करावे आणि आपले पत मुल्यांकन चांगले राहील याची दक्षता घ्यावी.

## खातेदारांनी डिजिटल सेवा वापरताना घ्यावयाची काळजी

*✻एटीएम,युपीआय,मोबाईल ॲपचा पासवर्ड सतत बदला ✻तुमची माहिती फोनवरून कोणासही सांगू नका✻मोबाईल अथवा ई-मेलवर येणाऱ्या कोणत्याही अज्ञात लिंक, ईमेज किंवा आयकॉनवर क्लिक करू नका.✻कोणतेही अज्ञात ॲप किंवा ऑनलाईन गेम डॉउनलोड करू नका. ✻कोणत्याही ठिकाणी बाहेर मोफत वापरण्यास मिळणारे वाय-फाय इंटरनेट वापरू नका.✻व्हॉटसअप, फेसबुक, इंस्टाग्राम, टेलिग्राम इ. सोशल साईटवर आपली माहिती शेअर करू नका. ✻ बँक फोन करून तुमचा कार्ड,सीव्हीव्ही किंवा ओटीपी नंबर कधीच मागत नाही. ✻तुमचा कार्ड,सिव्हीव्ही किंवा ओटीपी नंबर फोन,एसमएस व्हॉटसअपने कोणासही देऊ नका ✻ इतर व्यक्तींना तुमचा पिन नंबर दिसणार नाही अशा पद्धतीने तो एटीएम मशीनमध्ये घालावा.✻बँकेच्या व्यवहाराचा संदेश अथवा एसएमएस मिळण्यासाठी आपला मोबाईल नंबर बँकेत अद्यावत करा.*

## स्वातंत्र्यदिनी विकसित भारत थीम

नवी दिल्ली-७८ व्या स्वातंत्र्यदिन सोहळ्याची थीम 'विकसित भारत' अशी आहे. २०४७ पर्यंत देशाला विकसित राष्ट्रात रुपांतरित करण्याच्या सरकारच्या संकल्पनेनुसार ही

विकसित भारत अभियान 1947 TO 2047

थीम निश्चित करण्यात आली आहे. संरक्षण मंत्रालयाचे प्रवक्ते ए. भारतभूषण बाबू यांनी एक्स वरील एका पोस्टमध्ये यासंबंधी माहिती दिली. थीम जाहीर करतानाच त्यांनी लाल किल्ला आणि विकास भारतची घोषणा दर्शविणारे एक पोस्टरही शेअर केले आहे. भारत २०४७ मध्ये स्वातंत्र्याची १०० वे पूर्ण करणार असल्याने गेल्या तीन वर्षांपासूनच काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहे. या उद्दिष्टांमध्ये परिस्थितीनुरुप वेळोवेळी सुधारणा केली जात आहे.

## KOLHAPUR MAHILA SAHAKARI BANK LTD.,KOLHAPUR

**Schedules to the Financial Statements ( Amount in Lakh)**

### SCHEDULES - 1 CAPITAL

| Particulars | 31-03-2024 | 31-03-2023 |
|---|---|---|
| Authorised Share Capital (5,00,00,000/- ''A''Class shares of Rs.-1000/- each ) | | |
| **Issued & paid Up** | | |
| **Share of Rs.1000/- each fully paid up** | | |
| **1) Individual** | 477.70 | 457.66 |
| **2) Co-op Institutiions/ State Govt.** | 0.00 | 0.00 |
| **3) Other** | 0.00 | 0.00 |
| **Total** | **477.70** | **457.66** |

### SCHEDULE - 2 RESERVE AND SURPLUS


| Particulars | 31-03-2024 | 31-03-2023 |
|---|---|---|
| **1 Statutory Reserve** | **326.42** | **306.76** |
| Opening Balance | 306.76 | 283.85 |
| Additions during the year | 19.66 | 22.91 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **2 Building Fund** | **80.07** | **80.07** |
| Opening Balance | 80.07 | 80.07 |
| Additions during the year | 0.00 | 0.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **3 Dividend Equalization fund** | **3.09** | 3.09 |
| Opening Balance | 3.09 | 3.09 |
| Additions during the year | 0.00 | 0.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **4 Bad and Doubtful Debts Reserve** | **547.14** | **537.94** |
| Opening Balance | 537.94 | 502.94 |
| Additions during the year | 9.20 | 35.00 |
| Deductions during the year | 0.0 | 0.00 |
| **5 Investment Fluctuation Reserve** | **14.01** | **3.00** |
| Opening Balance | 3.00 | 3.00 |
| Additions during the year | 11.01 | 0.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **6 Resolution Framework 2.0** | **0.00** | **0.00** |
| Opening Balance | 0.00 | 0.00 |
| Additions during the year | 0.00 | 0.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **7.Special Reserve U/s 63 ( C ) of MSCS Act 2002** | **27.00** | **17.00** |
| Opening Balance | 17.00 | 13.00 |
| Additions during the year | 10.00 | 4.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **8.Charity Fund** | **0.78** | **0.78** |
| Opening Balance | 0.78 | 0.56 |
| Additions during the year | 0.00 | 0.22 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **9. Continegency Fund** | **23.00** | **23.00** |
| Opening Balance | 23.00 | 20.00 |
| Additions during the year | 0.00 | 3.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **10.Provision for Standerd asstes** | **29.00** | **18.00** |
| Opening Balance | 18.00 | 18.00 |
| Additions during the year | 11.00 | 0.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **11. Staff Welfare fund** | **1.62** | **1.65** |
| Opening Balance | 1.65 | 1.23 |
| Additions during the year | 0.00 | 0.42 |
| Deductions during the year | 0.03 | 0.00 |
| **12.Social Welfare fund** | **0.00** | **0.00** |
| Opening Balance | 0.00 | 0.00 |
| Additions during the year | 0.00 | 0.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **13.Investment Depreciation Reserve** | **134.11** | **134.11** |
| Opening Balance | 134.11 | 106.61 |
| Additions during the year | 0.00 | 27.50 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **14.Building revalution Reserve** | **0.00** | **0.00** |
| Opening Balance | 0.00 | 0.00 |
| Additions during the year | 0.00 | 0.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **15.Land Revalution Reserve** | **0.00** | **0.00** |
| Opening Balance | 0.00 | 0.00 |
| Additions during the year | 0.00 | 0.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **16.Contingent Provision Against Standard Assets** | **0.00** | **0.00** |
| Opening Balance | 0.00 | 0.00 |
| Additions during the year | 0.00 | 0.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **17.General Provision For Loss Reserve** | **0.00** | **0.00** |
| Opening Balance | 0.00 | 0.00 |
| Additions during the year | 0.00 | 0.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **18. Standard Covid-19 Reserve** | **10.00** | **10.00** |
| Opening Balance | 10.00 | 10.00 |
| Additions during the year | 0.00 | 0.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **19.Special Reserve under Income** | **0.00** | **0.00** |
| Opening Balance | 0.00 | 0.00 |
| Additions during the year | 0.00 | 0.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **20.Non performing Investment** | **0.00** | **0.00** |
| Opening Balance | 0.00 | 0.00 |
| Additions during the year | 0.00 | 0.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **21.Member welfare Fund** | **2.36** | **2.37** |
| Opening Balance | 2.37 | 1.92 |
| Additions during the year | 0.00 | 0.46 |
| Deductions during the year | 0.01 | 0.01 |
| **22.Computer Fund** | **5.00** | **5.00** |
| Opening Balance | 5.00 | 0.00 |
| Additions during the year | 0.00 | 5.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **23.Balacne in profit and Loss** | **74.64** | **72.17** |
| Opening Balance | 0.00 | 0.00 |
| Additions during the year | 74.64 | 72.17 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **Total** | **1278.24** | **1214.94** |

# देणाऱ्याने देत जावे...

विंदा म्हणती,

**'मातीतून मी आलो वरती,**
**मातीचे घेउनिया गाणे'**

ही भावगर्भ जाणीव प्रामाणिकपणे जपणारा हा मनस्वी कवी! विंदांचा वैचारिक प्रवास सांगायचा तर प्रथम ते हिंदुसभावादी, आर्य सामाजिस्ट इ. इ. हैदराबादच्या भागानगर सत्याग्रहात सामील झालेले. त्यांनी दंडबेडीसहितची सात महिन्यांची सक्त मजुरीही भोगली, पण तुरुंगात त्यांना रामजी भेटले आणि ते उपनिषदांकडे वळले. तासगावला त्यांना भेटले गोरे मास्तर, मग ते गांधीवादी विचारसरणीकडे आकृष्ट झाले. अगदी चरख्यावर सूतकताई




करावी इतकी कृतिशीलताही त्यांच्या ठिकाणी आली. आणि नंतर त्यांनी वळण घेतले ते मार्क्सवादाकडे. पंडित राहुल सांस्कृत्यायन यांच्या 'व्होल्गा ते गंगा'ने ते खडबडून जागे झाले. शाहीर गवाणकर, शाहीर अमरशेख, अण्णा भाऊ साठे या सर्जनशील आणि कृतिशील साम्यवादी विचारसरणीच्या लोकांचा सहवास व पगडा त्यांच्यावर बसला. आणि मग विस्तृत अशी असणारी साम्यवादी विचारसरणीची वैचारिक बैठक दृढतम झाली.

करंदीकर, बापट आणि पाडगावकर या कविमित्रांनी आपल्या काव्यवाचनाच्या मैफिलींनी अवघा महाराष्ट्र दणाणून सोडला होता. विंदांच्या कवितेचे खरे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे सामाजिक भान. पाश्चिमात्य परंपरेतील पुरोगामित्व आणि रोमँटिसिझम तर त्यांनी जपलेच, पण संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांचीही बूज मनात राखली. त्याचमुळे परंपरा आणि नवता यांचा मनोज्ञ संगम त्यांच्या साहित्यात दिसून येतो. आपल्या स्वत:च्या कवितांचे वाचन तर विंदांनी केलेच, पण 'ज्ञानेश्वर ते मर्ढेकर' यांच्या कवितांचे वाचनही त्यांनी केले. काव्यवाचनाची आपली भूमिका मांडताना विंदा म्हणतात, 'काव्यवाचानाद्वारे काही कवितांचा चांगला प्रत्यय येतो. सामान्य लोकांना काव्यसन्मुख करण्याच्या दृष्टीने, काव्याचा प्रत्यय येण्याच्या दृष्टीने, काव्यवाचन करणे महत्त्वाचे आहे. कविता लोकांपर्यंत नेणं मला महत्त्वाचं वाटतं.'

करंदीकरांची भाषा रोखठोक आहे, विचार अत्यंत सडेतोड आहेत, तरीही या कवितेतील वैचारिक सौंदर्य जाणवत राहते. समाज व्यवस्थेतील दु:ख ते अतितीव्रतेने मांडतात. परिवर्तनाची दिशाही त्यांना दिसत असते. विज्ञानातील प्रगती, साम्यवादातील शक्ती, संघटनेची ताकद यामुळे ते झपाटून जातात. नागपूरला एक सर्वभाषिक कवी संमेलन भरले होते आणि अध्यक्ष स्थान भूषवित होते संत तुकडोजी

(पान ३ वर)

## SCHEDULES - 3 -DEPOSITS

| Particulars | 31-03-2024 | 31-03-2023 |
|---|---|---|
| A.1 Demand Deposits | 536.77 | 542.94 |
| (I) Form Bank | 0 | 0.00 |
| (ii) Form Others | 536.77 | 542.94 |
| 2.Savings Bank Deposits | 1892.95 | 1842.45 |
| 3.Term Deposits | 7467.54 | 7402.52 |
| (I) Form Bank | 0 | 0.00 |
| (ii) Form Others | 7467.54 | 7402.52 |
| **Total (1+2+3)** | **9897.26** | **9787.91** |
| **B.(i) Deposits of branches in India** | **9897.26** | **9787.91** |
| **(ii) Deposits of branches outside india** | **0** | **0.00** |
| **Total (I+II)** | **9897.26** | **9787.91** |

## SCHEDULES - 4 -BORROWINGS

| Particulars | 31-03-2024 | 31-03-2023 |
|---|---|---|
| I. Borrowing in india | 0.00 | 0.00 |
| (i) Reserve Bank of India (LAF) | 0.00 | 0.00 |
| (ii) Other banks | 0.00 | 0.00 |
| (iii) Other institutions and agencies | 0.00 | 0.00 |
| (iv)Other long Term ( Subordinated deposits (LDT) | 0.00 | 0.00 |
| II. Borrowings outside india | 0.00 | 0.00 |
| TOTAL (I&II) | 0.00 | 0.00 |

Secured borrowings included I and II Above Rs Lacs (Last year Rs Lacs)

## SCHEDULES - 5 -OTHER LAIBILITIES AND PROVISIONS

| Particulars | 31-03-2024 | 31-03-2023 |
|---|---|---|
| I Bills payable | 3.70 | 7.94 |
| II. Inter-office adjustments (Net) | 0 | 0.00 |
| III Interests accrued | 603.09 | 603.86 |
| IV Others ( including Provisions) | 101.54 | 99.91 |
| **TOTAL** | **708.33** | **711.71** |

## SCHEDULES - 6 - CASH AND BALANCES WITH RESERVE BANK OF INDIA

| Particulars | 31-03-2024 | 31-03-2023 |
|---|---|---|
| I Cash in hand ( Including foreign currency notes) | 169.92 | 80.03 |
| II Balance with Reserve Bank of India | 0.00 | 0.00 |
| (i) in Current Account | 0.00 | 0.00 |
| (ii) in other Account | 0.00 | 0.00 |
| **TOTAL (I&II)** | **169.92** | **80.03** |

## SCHEDULES - 7 - BALANCE WITH BANKS AND MONEY AT CALL AND SHORT NOTICES

| Particulars | 31-03-2024 | 31-03-2023 |
|---|---|---|
| I. In India | 1586.84 | 1526.23 |
| i. Balances with banks | 1586.84 | 1526.23 |
| a. In Current Accounts | 371.84 | 381.23 |
| b.In Other Deposit Accouts | 1215.00 | 1145.00 |
| II. Money at call and short notice | 0.00 | 0.00 |
| a. With banks | 0.00 | 0.00 |
| b.With other institutions (RBI LAF) | 0.00 | 0.00 |
| TOTAL (i&ii) | 1586.84 | 1526.23 |
| II. Outside india | 0.00 | 0.00 |
| i. in Current Accounts | 0.00 | 0.00 |
| ii.in Other Deposit Accounts | 0.00 | 0.00 |
| iii Money at call and short notices | 0.00 | 0.00 |
| **TOTAL ( I,ii & iii )** | 0.00 | 0.00 |
| **GRAND TOTAL ( I & II )** | **1586.84** | **1526.23** |

## SCHEDULES - 8 - INVESTMENT

| Particulars | 31-03-2024 | 31-03-2023 |
|---|---|---|
| I.Investment in india in | 3864.55 | 3890.16 |
| i. Government Securities | 3856.55 | 3882.16 |
| ii. Other approved securities | 0 | 0.00 |
| iii Shares | 8.00 | 8.00 |
| iv Debentures and Bonds | 0 | 0.00 |
| v Subsidiaries and / or Joint Ventures | 0 | 0.00 |
| vi Others ( SRs issued by ARCs) | 0 | 0.00 |
| TOTAL | **3864.55** | 3890.16 |
| II.Investment outside in India in | 0.00 | 0.00 |
| i.Goverment Securities ( including Local authorities) | 0.00 | 0.00 |
| ii Subsidiaries and / or Joint Ventures | 0.00 | 0.00 |
| iii.Other Investments ( to be specified) | 0.00 | 0.00 |
| **TOTAL** | 0.00 | 0.00 |
| **GRAND TOTAL ( I & II )** | **3864.55** | **3890.16** |

## SCHEDULES - 9 - ADVANCES

| Particulars | 31-03-2024 | 31-03-2023 |
|---|---|---|
| A (i) Bills purchased and discounted | 0.00 | 0.00 |
| (ii) Cash credits,overdrafts and loans repayable Guarantees | 1733.82 | 1703.90 |
| (iii) Term Loans | 4234.66 | 4193.23 |
| TOTAL | **5968.48** | **5897.13** |
| B. (i) Secured by tangible assets | 0.00 | 0.00 |
| (ii) Covered by Bank / Government Guarantees | 0.00 | 0.00 |
| (iii) Unsecured | 661.96 | 705.97 |
| TOTAL | 661.96 | 705.97 |
| C.I. Advances in india | 5968.48 | 5897.13 |
| (i) Priority Sectores | 4495.59 | 4811.98 |
| (ii) Public Sector | 0.00 | 0.00 |
| (iii) Banks | 0.00 | 0.00 |
| (iv) Others | 1472.89 | 1085.15 |
| C.II. Advances Outside India | 0.00 | 0.00 |
| (i) Due form Banks | 0.00 | 0.00 |
| (ii) Due form other | 0.00 | 0.00 |
| (a) bills purchased and discounted | 0.00 | 0.00 |
| (b) syndicated loans | 0.00 | 0.00 |
| ( c) Others | 0.00 | 0.00 |
| **TOTAL** | **5968.48** | **5897.13** |
| **Grand Total ( C.I.& C.II.)** | **5968.48** | **5897.13** |

## SCHEDULES - 10 - FIXED ASSETS

| Particulars | 31-03-2024 | 31-03-2023 |
|---|---|---|
| A. Premises ( including land) | | |
| Gross Block | 0.00 | 0.00 |
| At cost on 31 st march of the preceding year | 48.79 | 50.04 |
| Additions during the year | 0.00 | 0.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| TOTAL | 48.79 | 50.04 |
| DEPRECITATION | | |
| As at 31 st March of the preceding year | 0 | 0.00 |
| Charge for the year | 0 | 0.00 |
| on deductions during the year | 1.22 | 1.25 |
| TOTAL | 1.22 | 1.25 |
| Net block (A) | 47.57 | 48.79 |
| B.Other Fixed Assets | | |
| (including furniture and Fixtures) | | |
| Gross Block | | |
| At cost on 31 st march of the preceding year | 31.92 | 36.06 |
| Additions during the year | 36.15 | 9.36 |
| Deductions during the year | 0 | 0.00 |
| TOTAL | 68.07 | 45.42 |
| DEPRECITATION | | |
| As at 31 st March of the preceding year | 10.34 | 13.50 |
| Charge for the year | | |
| on deductions during the year | 0.53 | |
| TOTAL | 10.87 | 13.50 |
| Net block (B) | 57.20 | 31.92 |
| C.Net Block (C = A+B ) | **104.77** | **80.71** |

## SCHEDULES - 11 - OTHER ASSETS

| Particulars | 31-03-2024 | 31-03-2023 |
|---|---|---|
| I. Inter-office adjustment (net) | 0.00 | 0.00 |
| II. Interest accrued | 600.25 | 621.70 |
| III. Tax paid in advance / tax deducted at source (TDS) | 30.00 | 46.02 |
| IV.Stationery and Stamps | 0.00 | 0.00 |
| V. Non-banking assets acquired in satisfaction of claims | 0.00 | 0.00 |
| VI. Others | 36.72 | 30.24 |
| **TOTAL** | **666.97** | **697.96** |

## SCHEDULES - 12 - CONTINGENT LIABILITIES

| Particulars | 31-03-2024 | 31-03-2023 |
|---|---|---|
| I.Claims against the bank not acknowled as debts | | |
| II. Liability for partly paid investments | 0.00 | 0.00 |
| III. Liability on account of outstanding forward exchange | 0.00 | 0.00 |
| contracts | 0.00 | 0.00 |
| IV.Guarantees given on behalf of constituents | 0.00 | 0.00 |
| (a) In India | 0.00 | 0.00 |
| (b) outside India | 0.00 | 0.00 |
| V.Acceptances,endorsements and other obligations | 0.00 | 0.00 |
| VI. Other items for which the bank is contingently liable (DEAF) | 14.36 | 13.93 |
| **TOTAL** | **14.36** | **13.93** |

## SCHEDULES - 13 - INTEREST EARNED

| Particulars | 31-03-2024 | 31-03-2023 |
|---|---|---|
| I.Interest / discount on advance / bills | 691.64 | 628.30 |
| ii. Income on investments | 305.14 | 314.36 |
| iii.interest on balance with Reserve Bank of India and other inter- bank funds | 0.00 | 0.00 |
| iv. Others | 0.00 | 0.00 |
| **TOTAL** | **996.78** | **942.66** |

## SCHEDULES - 14 - OTHER INCOME

| Particulars | 31-03-2024 | 31-03-2023 |
|---|---|---|
| I.Commission,exchange and brokerage | 0.75 | 0.87 |
| ii.Profit on sale of investments Less : Loss on sale of investments | 0 | 0.00 |
| iii Profit on revaluation of investments | 0.00 | 0.00 |
| iv Profit on sale of land buildings and other assets Less : Loss on sale of land building and other assets | 0.08 | 0.01 |
| v.Profit on exchange transactions Less : Losss on exchange transactions | 0.00 | 0.00 |
| vi.Income earned by way of dividends etc.from subsidiaries/ companies and/ of joint ventures abroad / in india | 0.80 | 0.80 |
| vii NPA Provision written Back | 0.00 | 0.00 |
| viii Deffered Tax Assets (DTA) | 0.00 | 0.00 |
| ix. Miscellaneous Income | 37.4 | 38.02 |
| TOTAL | **39.03** | **39.70** |

Note : Under items II to V loss figures may be shown in brackets.

## SCHEDULES - 15 - INTEREST EXPENDED

| Particulars | 31-03-2024 | 31-03-2023 |
|---|---|---|
| I.Interest on deposits | 533.56 | 515.78 |
| ii.Interest on Reserve Bank of India/ Inter-bank borrowings | 0.00 | 0.00 |
| iii.Others | 0.91 | 4.51 |
| TOTAL | **534.47** | **520.29** |

## SCHEDULES - 16 - OPERATING EXPENSES

| Particulars | 31-03-2024 | 31-03-2023 |
|---|---|---|
| I.Payments to and provisions for exployees | 197.10 | 145.19 |
| ii.Rent,taxes and lighting | 28.85 | 23.4 |
| iii.Printing and Stationery | 2.25 | 0.53 |
| iv.Advertisement and publicity | 1.58 | 0.93 |
| v.Depreciation on bank's property | 11.56 | 13.50 |
| vi Director's fees,allowances and expenses | 3.05 | 1.85 |
| vi.Auditors fees and expenses ( including branch auditors | 9.49 | 9.32 |
| vii Law charges | 0.86 | 0.18 |
| ix postages Telegrams & Telephons ect | 2.99 | 3.12 |
| x. Repairs and maintenance | 0.86 | 1.65 |
| xi Insurance | 16.76 | 22.82 |
| xii Other expenditure | 74.36 | 61.55 |
| xiii Loss on NON SLR Bonds | 0.00 | 0.00 |
| **TOTAL** | **349.71** | **284.04** |

## SCHEDULES - 17 - PROVISIONS AND CONTINGENCIES

| Particulars | 31-03-2024 | 31-03-2023 |
|---|---|---|
| i.Bad & Doutful Debts Reserve (BDDR) Provision | 9.20 | 35.00 |
| ii.Provision against Standard Assets | 11.00 | 0.00 |
| iii.Provision for Standard Account(COVID-19) | 0.00 | 0.00 |
| iv.Provision for Resolution Framework 2.0 | 0.00 | 0.00 |
| v.Provision for Restrutured for Advances (COVID -19) | 0.00 | 0.00 |
| vi.Investment Depreciation Reserve Provision | 0.61 | 28.11 |
| vii Provision for Income Tax | 46.18 | 42.75 |
| viii Short Provision for Income Tax FY 2020-21 | 0.00 | 0.00 |
| ix Special Reserve under Income Tax | 10.00 | 0.00 |
| x Provision for Non-Performing investment | 0.00 | 0.00 |
| xi Provision for ARC Security Receipts | 0.00 | 0.00 |
| **TOTAL** | **76.99** | **105.86** |

# देणाऱ्याने देत जावे...

(पान २ वरून)

महाराज. त्यांनी आपल्या भाषणातून नवकवितेविषयी औपरोधिक सूर आळवला. 'नवकविता मी फारशी वाचलेली नाही. ही कविता गवता ऐसी उदंड वाढलेली आहे, असं ऐकतो. तुम्हाला माझी विनवणी आहे की तुम्ही या समाजाला चांगला खुराक मिळेल असं पौष्टिक लिहा.' नवकविता न वाचताच अध्यक्षांनी केलेला नवकवितेचा अपमान विंदांना कसा रुचावा? जरासे रोशानेच त्यांनी या टीकेला उत्तर दिले – 'आम्ही नवकवी देऊन देऊन काय देणार? आमची कविता गवतासारखी वाढलेली! त्या गवताचीच एक पेंढी मी महाराजांसमोर सोडतो.' आणि त्यांनी एक कविता सादर केली–

**'ती जनता अमर आहे.....**
**जनतेच्या पोटामध्ये,**
**आग आहे, आग आहे**
**जनतेच्या डोळ्यांमध्ये,**
**शंकराचा राग आहे....**
**जनतेच्या मुक्तीसाठी,**
**अजून एक समर आहे**
**आणि जिचा आत्मा एक,**
**ती जनता अमर आहे....'**

कोकणापासूनच अनुभवलेली आर्थिक व सामाजिक विषमतेची चित्रे त्यांच्या कवितेतून, अनुभवातील व्यक्तिगत स्वरूपाची नाळ तोडून पसरलेली दिसतात.

'स्वेदगंगे'च्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत अनंत काणेकर म्हणतात, 'दहा वर्षांपूर्वीच मी म्हटले होते की, करंदीकरांना मराठी काव्यक्षेत्रात महत्त्वाचे स्थान मिळाल्याशिवाय राहणार नाही. याची मला आता खात्री वाटते.' अनंत काणेकरांनी जे म्हटलेले आहे, ते आज आणखी सार्थ झालेले आहे. विंदा म्हणतात, 'स्वेदगंगा लिहिताना माझ्या मागे केशवसुतांच्या 'तुतारी'चे पार्श्वसंगीत खडे होते. पण 'जीवितकोडे', 'रक्तसमाधी' व 'कीर्तन' या कविता लिहिताना मला त्या जाणिवेतले अंत: संगीतच ऐकू येत होते आणि त्याच्याशी सुसंगत अशी वेगळी शैली आपोआप घडवली जात होती.'

आपल्या विविध सामाजिक कवितांमधून विंदांना विविध रूपांमधील शोषकांकडून होणारे शोषितांचे शोषण हे मार्क्सवादी विचारसरणीचे एक सूत्र मांडलेले आहे. त्यांना प्राप्त झालेल्या 'ज्ञानपीठ पुरस्कारा'ने त्यांनी मराठी भाषेला राष्ट्रीय पातळीवर पोहोचविले. त्यांच्या साहित्य निर्मितीबद्दल राज्य आणि केंद्रा सहित जवळ जवळ पस्तीस पुरस्कार त्यांना प्राप्त झाले. 'कबीर', 'कोणार्क', 'साहित्य अकादमी सन्मान' हे पुरस्कारही विंदांना ज्ञानपीठ पुरस्काराबरोबर मिळालेले आहेत. पण विंदांची थोरवी अशी की, पुरस्कारांची रक्कम त्यांनी मुक्त हस्ताने समाजासाठी देऊन टाकली. जणू त्यांची भूमिका अशीच होती...

**देणाऱ्याने देत जावे**
**घेणाऱ्याने घेत जावे**
**घेता घेता एक दिवस**
**देणाऱ्याचे हात घ्यावे**